Remove Watermark Wondershare PDFelement

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी)  कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजने अंतर्गत ६० संशोधकांनी सादर केलेल्या एक कोटी बारा लाख २४ हजार रूपयांच्या प्रकल्पांचे सादरीकरणाची सभा दि. २४ व २५ ऑगस्ट रोजी विद्यापीठात आयोजित केली आहे.

विद्यापीठाच्या प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयांमध्ये संशोधन कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात (२०२३-२४) सदर योजनेकरीता १ कोटी ५० लाख रूपयांची भरीव तरतुद करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत विद्यापीठाने प्रथमच ऑनलाईन प्रस्ताव मागविले होते. एकुण ८२ ऑनलाईन प्रस्ताव नोंदणी झाले. त्यापैकी प्रथम छाननीनंतर ६० प्रस्ताव सादरीकरणासाठी निवड करण्यात आले आहेत. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा ३५, मानव्यविज्ञान विद्याशाखा १५, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे ७, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे ३ प्रस्तावांचा समावेश आहे. हे सर्व प्रस्ताव शिक्षकांनी सादर केले असून दि. २५ ऑगस्ट रोजी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली विषयनिहाय सादरीकरणात संशोधक/शिक्षक प्रकल्पाचे सादरीकरण करतील. दि. २६ ऑगस्ट रोजी वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्य विज्ञान, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील संशोधक प्रकल्पाचे सादरीकरण अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखाली विषयनिहाय करण्यात येणार आहे. या सादरीकरणातून अंतिमत: अनुदानासाठी संशोधन प्रकल्पांची निवड केली जाणार आहे.

Wondershare PDFelement

बातमी क्रमांक २

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी एम. टेक. प्रथम वर्ष अभियांत्रिकी/तांत्रिकी अभ्यासक्रमाच्या काही जागा रिक्त आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांना दि. २८ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत संस्थेत अर्ज करण्याची मूदत देण्यात आलेली आहे.

संस्थेचे संचालक डॉ. जे. बी. नाईक यांनी कळविले आहे की, सदर अभ्यासक्रमांसाठी रिक्त जागांची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ([www.nmu.ac.in](http://www.nmu.ac.in)) उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना/पालकांना आवाहन करण्यात येते की, अधिक माहितीसाठी या संस्थेतील डॉ. पवन डी. मेश्राम संपर्क ८०८७२७६९२२ व डॉ. तुषार डी. देशपांडे समन्वयक संपर्क ८९५६१४०९६६ यांच्याशी संपर्क साधावा.

Remove Watermark Wondershare PDFelement

बातमी क्रमांक ३

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत करिअर कट्टा अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलंन्स चा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमात एमआयटीएससी करिअर कट्टाचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या उपलब्ध संधीबाबत मार्गदर्शन केले. मु. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. भारंबे यांनी कौशल्य विकासावर तर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी करिअर कट्टाच्या माध्यमातुन उपलब्ध कोर्सेसविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या संयोजक व करिअर कट्टाच्या समन्वयक प्रा. मधुलिका सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. रमेश सरदार, डॉ. आर. आर. चव्हाण, डॉ. अतुल बारेकर, सागर वखारे उपस्थित होते. हर्षल नेरकर यांनी आभार मानले.

बातमी क्रमांक ४

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने शनिवार दि. २६ ऑगस्ट रोजी जळगावच्या मातोश्री वृध्दाश्रमात “समुपदेशक आपल्यादारी” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार सकाळी १० ते २ या कालावधीत केशवस्मृती प्रतिष्ठाण संचलित मातोश्री वृध्दाश्रम सावखेडा येथे होणा-या या कार्यक्रमात समुपदेशनासाठी डॉ. जे. एन. चौबे, डॉ. वीणा महाजन हे उपस्थित राहणार असल्याची माहिती संचालक डॉ. आशुतोष पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी

Wondershare PDFelement